महासागर अमरावती
मंगळवार, दि. 18 फेब्रुवारी 2025
पान 3

# 4605 चालकाचे 43.64 लाखाचे चलान पेंडिंग

**कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी दंड भरा**

**वाहतुक पोलिस विभागाकडून आवाहन**


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 17)** - शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी वाहतूक विभागाने 2024 मध्ये एकूण 5587 वाहनचालकांवर कारवाई करून, 52 लाख 89 हजार 400 रुपये दंड वसूल केला. परंतू आतापर्यंत 4605 चालकांनी 43 लाख 64 हजार 850 रुपयांचा दंड भरलेला नाही. त्यामुळे पोलिसांची कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी वाहनचालकांनी तात्काळ दंडाची रक्कम भरावी, असे आवाहन वाहतुक शाखा विभागाकडून करण्यात आला आहे.

भरलेल्या रकमेच्या तुलनेत न भरलेल्या रकमेतील फरक खूप जास्त असल्याने, वाहतूक विभाग येत्या काही दिवसांत प्रलंबित ई-चलान प्रकरणांमध्ये तोडगा काढण्यासाठी एक विशेष मोहीम सुरू करणार आहे. दरम्यान, वाहन मालकांना कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून, सर्व चालक व मालकांना विनंती करण्यात आली की त्यांनी महाट्राफिक ॲप किंवा वेबसाइट लिंकवर जाऊन त्यांच्या वाहनावरील प्रलंबित ई-चालान तपासावे आणि चलन त्वरित ऑनलाइन किंवा शहर वाहतूक कार्यालयात भरावे. अपघात आणि दंड टाळण्यासाठी, शहर वाहतूक विभागाने सर्व चालक/मालकांना सुरक्षित वाहतूक तसेच रस्ता सुरक्षेसाठी आणि अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# वैद्यकिय साहित्य : रुग्णांच्या खिशावर दरोडा

**15 रुपयांना मिळणारी वस्तू 165 रुपयांना**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.17)**- रुग्णालयांशी संलग्न असलेल्या औषधी दुकानांद्वारा, रुग्णालयात दाखल रुग्णावरील उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय साहित्याची विक्री करताना, कुटुंबीयांच्या खिशावर अक्षरशः 'दरोडा'च घालण्यात येत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.


युरिन बॅग, कॅथेटर, आयव्ही सेट, आयव्ही कॅथेटर, आयव्ही कॅन्युला, नेब्युलायझरसाठी लागणारे मास्क, पीडिया ड्रीप, बीटी सेट, सर्जिकल कापूस यांसारख्या वैद्यकीय साहित्याची एमआरपी मूळ खरेदी किमतीच्या जवळपास 5 ते 10 पट आहे.

| साहित्य | एमआरपी | खरेदी | बाजार भाव | रूग्णालय |
|---|---|---|---|---|
| युरिन बॅग | 316 | 38 ते 39 | 60 ते 70 | 310 |
| कॅथेटर | 743 | 130 | 200 ते 210 | 740 |
| आयव्ही सेट | 180 | 14 | 30 ते 40 | 180 |
| आयव्ही कॅथेटर | 168 | 15 | 45 ते 50 | 165 |
| आयव्ही कॅन्युला | 187 | 14.50 | 40 ते 50 | 180 |
| नेब्युलायझर मास्क | 572 | 47 | 80 ते 90 | 570 |
| पीडिया ड्रीप | 280 | 40 | 60 ते 70 | 280 |
| बीटी सेट | 179 | 16 | 30 ते 35 | 175 |

**बाहेर स्वस्त, आत महाग**

रुग्णालयांशी संलग्न औषधी दुकानांद्वारा 38 रुपये खरेदी किंमत असलेली वस्तू एमआरपी दराने थेट 310 रुपयांना विकली जाते, तर तीच वस्तू बाहेरील औषधी दुकानांतून घेतल्यास केवळ 60 ते 70 रुपयांत मिळते.

# अचलपूर-चांदूर बाजार मार्गावर अपघात, दुचाकी चालकाचा मृत्यू





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती**- अचलपूर ते चांदूर बाजार मार्गावरील तोंडगावजवळ सोमवारी (दि. 17) दुपारी झालेल्या अपघातात दुचाकी चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृतक दुचाकाची चालकाची ओळख नंदू सुखराम काटेकर (रा. नरखेड ता. काटोल जि.

नागपूर) अशी पटली. अचलपूरवरून चांदूर बाजारकडे जात असताना तोंडगाव नजीक या दुचाकी चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी दुभाजकाला जाऊन धडकली. दुचाकी चालक रस्त्याच्या खाली जाऊन पडला होता. दुचाकीचा लोखंडी भाग चालकाच्या डोक्याला लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दुर्घटनास्थळी तोंडगाव फाट्यावरील काही नागरिक मदतीला धावले. अपघाताची माहिती होताच अचलपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. जखमीला उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे दाखल केले असता त्याला मृत घोषित करण्यात आले.

## ग्रेस गुणांचे अर्ज 'आपले सरकार' द्वारे स्वीकारणार

**अमरावती** - दरवर्षीप्रमाणे इयत्ता 10वी व 12वी खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफ लाइन अर्ज मागविले जातात. माहितीचे संकलन कार्यालयाद् ?वारे हे गुण माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मंडळात पाठवले जातात. सन 2024-25 पासून ग्रेस गुणासाठी केली जाणारी प्रक्रिया 'आपले सरकार' पोर्टल द्वारा ऑनलाईन करण्यात आले आहे. त्यामुळे खेळाडू विद्यार्थ्यांनी या पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे 10 मार्च, 2025 पर्यंत सादर करावे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# कटलरीच्या तीनचाकी गाडीला आग

**साहित्य जळून खाक, आग लावल्याचा संशय**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 17)** - टाकरखेडा संभु येथील एका कटलरीच्या तीनचाकी गाडीला लागलेल्या आगीत संपुर्ण साहित्य जळून खाक झाले आहे. ही घटना रविवारी (दि.16) मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

येथील रहीवासी रामराव किसन मेश्राम यांचा कटलरीचा व्यवसाय आहे. तिनचाकी रिक्षावर त्यांनी कटलरीचे दुकान थाटले असून ते गावात सदर तिनचाकी गाडी फिरवून कटलरीचा व्यवसाय करतात. नियमितप्रमाणे त्यांनी कटलरीचे साहित्य थाटलेली गाडी घराबाहेर भिंतीला लावून ठेवली होती.

दरम्यान रविवारी मध्यमरात्रीनंतर या गाडीला अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. त्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत त्यावरील संपुर्ण साहित्य जळून खाक झाले होते. ही आग लावली असल्याचा संशय व्यक्त होत आहे. याबाबत त्यांनी वलगाव पोलिसात तक्रार दिली आहे.

# डोमा जवळीलअपघातात एक ठार, एक गंभीर

**चिखलदरा तालुक्यातील डोमा गावाजवळ घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.17)**- चिखलदरा तालुक्यातील काटकुंभ- डोमा मार्गावर आश्रम शाळेजवळ दुचाकी समोरासमोर धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात दहेंद्री येथील श्याम रमेश कास्देकर (27 वर्षे) युवकाचा जागीच मृत्यु झाला. तर काटकुंभ येथील सोनु परसराम बेठेकर (24 वर्षे) गंभीर जखमी झाला. सोनुला काटकुंभ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचार करून त्याला अचलपूर येथे रेफर करण्यात आले आहे.

एम एच 27 / सीक्यु 4438 या क्रमांकाच्या युनिकॉन मोटरसायकल ने हे युवक दहेंद्री येथून चिखलदरा येथे जात होते.तर काटकुंभ येथील युवक एम एच 27 / एएल 6463 या क्रमांकाच्या टिव्हिएस अपाची दुचाकी विरुध्द दिशेने येत होते. या अपघातातील मृतक श्याम



कास्देकर हा दहेंद्री ग्रामपंचायत मध्ये चपराशी होता. मृतकावर पोस्टमार्टम करुन पोलिसांनी त्याचा मृतदेह त्याच्या



नातेवाईकांच्या ताब्यात दिला. अशी माहिती काटकुंभ पोलिस चौकी येथील जमादार सुरेश दहिकर, निलेश तोटे करत आहे.

# दुचाकी एकमेकांवर आदळल्या, एक ठार

**दोघे गंभीर जखमी**

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, (दि.17)** - अंजनगाव मार्गावरील बाभळी येथील नव्यानेच निर्माण झालेल्या मोठ्या पुलावर रविवारी (दि.16) दुपारी 1:30 वाजताच्या सुमारास दोन दुचाकी एकमेकांवर आदळल्याने एका इसमाचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर येथील रहिवाशी गजानन तायडे (वय 45 वर्ष) व त्यांची पत्नी संगीता तायडे हे दर्यापूर मार्गे सायत येथे कार्यक्रमासाठी जात असताना बाभळी पुलावरील वळणावर समोरून येणारा दुचाकी चालक अजय राठोड (वय 22 वर्ष) व त्याचा सहकारी हा दुचाकी भरधाव वेगाने चालवित येवढ्याकडे जात असताना गजानन तायडे यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये गजानन तायडे, त्यांच्या पत्नी संगीता तायडे व अजय राठोड हे



गंभीर जखमी झाले.

त्यांना तत्काळ उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे पोहचविण्यात आले, मात्र गजानन तायडे यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर संगीता तायडे ह्यांची प्रकृती चिंताजनक आहे. अजय राठोड याला अकोला येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. अपघातग्रस्तांना पाहण्यासाठी रुग्णालयात मोठी गर्दी जमली होती. पुढील कारवाई दर्यापूर पोलीस करित आहेत.

# कृषि प्रदर्शनीचा आज शेवटचा दिवस

**23 हजार शेतकऱ्यांनी व नागरीकांनी दिली भेट**







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.17)** - अमरावती येथे गेल्या तीन दिवसांपासून सांयन्सकोर मैदान येथे सुरु असलेल्या जिल्हास्तरीय कृषि विकास परिषद व प्रदर्शनीला सलग तिसऱ्या दिवशी शेतकरी व नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळाला.

काल प्रदर्शनीमध्ये सेंद्रिय शेती व प्रमाणीकरण,शेत बांधावरील जैविक प्रयोगशाळा,गांडुळखत निर्मिती व त्यातील व्यावसायीक संधी,मानव व वन्यजीव संघर्ष, केळी लागवड,शेतकरी उत्पादक कंपनी यांचेसाठी कृषिविषयक विविध योजनांची माहिती, सेंद्रिय शेती या विषयावर परीसंवाद झाले.सांयकाळी साहील पांढरे निर्मित सुर नवा ध्यास नवा हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.या प्रदर्शनीला सलग तिसर्या दिवशी विविध स्टॉलला जवळपास 23000 शेतकऱ्यांनी व नागरीकांनी भेट देऊन माहिती घेतली. प्रदर्शनीचे ठिकाणी उभारण्यात आलेल्या 288 विविध स्टॉल अंतर्गत 19 लाखांची उलाढाल झाली असे कृषि विभागाने सांगितले. विशेष म्हणजे या कृषि प्रदर्शनीला राज्यसभा सदस्य अनिल बोंडे हे पत्नी वसुधा बोंडे व कुटुंबासह हजर होते.सोबतच रामराव वडकुते माजी विधानपरीषद सदस्य,हिंगोली यांनीसुद्धा या प्रदर्शनीला हजेरी लावली.तसेच प्रदर्शनीला अमरावती शहरातील व आजु बाजुचे गावातील शेतकरी व नागरीकांनी मोठ्या प्रमाणात प्रदर्शनीला भेट दिली.उद्या प्रदर्शनीचा शेवटचा दिवस असल्यामुळे जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी व नागरीकांनी या प्रदर्शनीचा लाभ घ्यावा असे आवाहन राहुल सातपुते जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी केले आहे.

# बदनामीच्या भीतीने अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना**

**अमरावती** - नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका 15 वर्षीय गर्भवती अल्पवयीन मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना 15 फेब्रुवारी रोजी रात्री उघडकीस आला. याप्रकरणात पोलिस उपनिरीक्षक प्रदीप श्रीकृष्णराव शहाणे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस उपनिरीक्षक प्रदीप शहाणे हे 15 फेब्रुवारी रोजी पोलिस ठाण्यात कार्यरत होते. यावेळी टाकळी जहांगीर येथे एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक प्रदीप शहाणे व इतर कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. तेथे 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी बेडरूममध्ये पंख्याला फासी घेतलेल्या अवस्थेत आढळली. पोलिसांनी पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली. मात्र,16 फेब्रुवारी रोजी जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनानंतर अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने बळजबरीने शारीरिक संबंध ठेवल्याने ती गर्भवती राहिली असल्याचे समोर आले. त्यामुळे तिने आत्महत्या केली, अशी माहिती तपासात पुढे आली असून, पोलिस उपनिरीक्षक प्रदीप शहाणे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे.


# प्लुटो दिन : खगोलशास्त्रीयांकरिता आजचा महत्वाचा दिवस

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.17)**- आजचा दिवस खगोलशास्त्रज्ञांसाठी खूप खास आहे. बरोबर 92 वर्षांपूर्वी, 1930 मध्ये, अमेरिकन शास्त्रज्ञ क्लाइड टॉम्बॉघ यांनी प्लूटोचा शोध लावला. त्याचे नाव देण्याची प्रक्रिया देखील खूप खास आहे. 11 व्या वर्गातील एका विद्यार्थ्याने असे सुचवले की रोममधील अंधाराचा देव प्लूटो आहे. हा ग्रह देखील अंधारात आहे, म्हणून त्याचे नाव प्लूटो ठेवणे योग्य ठरेल. बरं, नाव ठरवण्यात आलं आणि 2006 पर्यंत ते सूर्यमालेतील 9 ग्रहांमध्ये गणलं जात होतं.

**2006 मध्ये ग्रहांच्या यादीतून केले बाहेर**

2006 मध्ये, खगोलीय रचनांची नावे देणारा गट, आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रीय संघ (ढ्ढ) ने एक बैठक घेतली आणि कोणत्याला ग्रह म्हणावे आणि कोणत्याला नाही हे ठरवले. नवीन व्याख्या




अशी होती की ती अशी कोणतीही खगोलीय रचना असेल जी सूर्याभोवती वर्तुळाकार मार्गाने फिरते आणि तिच्या सभोवतालची स्वच्छता करत राहते. या शेवटच्या स्थितीमुळे प्लूटोचा ग्रह म्हणून दर्जा हिरावून घेण्यात आला. आयएयूच्या मते, प्लूटो इतका लहान आहे की तो सूर्याभोवती फिरताना त्याच्या मार्गात येणारे खडक आणि इतर मोडतोड काढू शकत नाही. मग प्लूटोला बटू ग्रह म्हटले गेले.

खगोलशास्त्रातील मोठी शोधयात्रा आणि प्लूटोच्या प्रवासाचा इतिहास. विज्ञानप्रेमींनी आणि विद्यार्थ्यांनी या दिवशी प्लूटोबद्दल माहिती जाणून घेऊन त्याचा अभ्यास करावा. नासाने पाठवलेल्या 'न्यू होरायझन्स' या अंतराळयानाने प्लूटोचे विस्तृत फोटो आणि माहिती पृथ्वीपर्यंत पोहोचवली. प्लूटो दिन आपल्याला खगोलशास्त्राच्या नवनवीन रहस्यांमध्ये रुची निर्माण करण्याची संधी देतो. आजही वैज्ञानिक प्लूटो आणि त्याच्या चंद्रांवर संशोधन करत आहेत. त्यामुळे, या दिवशी प्लूटोबद्दल माहिती जाणून घेणे आणि आकाशाच्या गूढतेचा शोध घेण्यास प्रेरणा मिळणे महत्त्वाचे आहे.

**प्रविण गुल्हाणे ,**
**हौशी खगोलचिकित्सक**

**Bandhan Bank** | रीजनल ऑफिसः नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद-06. फोन: +91-79-26421671-75

**प्रतीकात्मक ताबा सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सेक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 या अधिनियमांतर्गत आणि कलम 13(12), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचून त्याअन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकृत अधिकाऱ्याने खालिल खात्यासमोर नमूद दिनांकेला मागणी नोटिस कर्जदार निर्गमित केली असून त्यात कथित सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत ती रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती. कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे याद्वारे कर्जदारांना, आणि सर्वसाधारण जनतेला नोटिस देण्यात येते की खाली सही करणाऱ्याने येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा, कथित ॲक्टचा सेक्शन 13(4) हा, कथित नियम 8 सह वाचला असता त्याखाली त्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या खात्यासमोर निर्देशित केलेल्या तारखेला घेतलेला आहे. याद्वारे कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार न करण्याचा सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे आणि मालमत्तेबाबत करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा रक्कम, व्याज, खर्च आणि शुल्कसाठी बंधन बँक लिमिटेडच्या प्रभारांच्या आधीन असेल. प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे/मोर्टगेजरचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| कर्जदाराचे नाव, हमीदार आणि कर्ज क्रमांक | मालमत्तेचे वर्णन (सुरक्षित मालमत्ता) | मागणी नोटिसेची दिनांक | प्रतीकात्मक ताबा दिनांक | मागणी सूचनेच्या खाते दिनांकेला थकित रक्कम |
|---|---|---|---|---|
| श्री हितेश खिमजी भाई पटेल<br>सौ.खुस्बु हितेश पटेल<br>श्री खिमजीभाई परबत भाई पटेल<br>श्री अरुणाबेन खिमजीभाई पटेल<br>श्री.मनोज खिमजीभाई पटेल<br>20005030003798 | भूखंड क्रमांक 38, सर्वेक्षण क्रमांक 530, घर क्रमांक 350, एकूण क्षेत्रफळ 251.07 चौ.मीटर, वॉर्ड क्रमांक 13, महेश कॉलनी, तहसील-वरूड, जिल्हा- अमरावती, महाराष्ट्र येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: मंजुरी लेआउट खुली जागा, पूर्व: 9 मीटर रुंद लेआउट रोड, पश्चिम : गिरधर राठी यांची मालमत्ता, दक्षिण: 9 मीटर रुंद लेआउट रोड | 11.11.2024 | 12.02.2025 | रु.20,00,534.77 |
| श्री.अमोल भास्करराव बुटले<br>श्री.भास्कर नथुजी बुटले<br>सौ.शालिनी भास्करराव बुटले<br>श्री.भूषण भास्करराव बुटले<br>श्री.चेतन भास्करराव बुटले<br>20005050003120 | सर्व्हे क्रमांक 604, मागणी क्रमांक 92/979, आष्टी, घर क्रमांक 538, हनुमान मंदिरा जवळ, तेलीपुरा, मौजा क्र. 12, वॉर्ड क्रमांक 02, वर्धा, महाराष्ट्र येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: रस्ता आणि वसतिगृह, पूर्व: रस्ता, पश्चिम : डोमाजी गुल्हाने घर, दक्षिण : राजेराम गुल्हाने यांची मालमत्ता | 11.11.2024 | 12.02.2025 | रु.16,01,117.98 |

स्थळः अमरावती-वर्धा
तारीख: 18/02/2025

अधिकृत अधिकारी
बंधन बँक लिमिटेड

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अमरावतीत 25 फलाटांचे नवे बसस्थानक होणार

## 35 कोटींचा निधी अपेक्षित; निधी मंजुरीनंतर कामाला होणार सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 17 )** – अमरावती शहराच्या वाहतूक व्यवस्थेत मोठी क्रांती होणार आहे. सध्याच्या मध्यवर्ती बसस्थानकाचे विस्तारीकरण करून त्याठिकाणी 25 फलाटांचे आधुनिक बसस्थानक उभारले जाणार आहे. या प्रकल्पासाठी शासनाने 15.21 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, तो 35 कोटींपर्यंत वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विभागीय मुख्यालय अमरावतीच्या असलेल्या बसस्थानकातून दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी ये-जा करतात. मुंबई, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि शेगाव अशा



प्रमुख शहरांशी थेट बस सेवा उपलब्ध आहे. वाढत्या प्रवासी संख्येमुळे सध्याचे दहा फलाटांचे बसस्थानक अपुरे पडत असल्याने त्याचे विस्तारीकरण अत्यावश्यक झाले आहे. नव्या प्रकल्पात सध्याच्या डेपोची जागा बसस्थानकासाठी वापरली जाणार आहे. डेपो तपोवन येथील 20 एकर क्षेत्रफळ असलेल्या कर्मशाळेत स्थलांतरित केला जाणार असून, त्यासाठी 11 कोटी रुपयांचा स्वतंत्र निधी मंजूर करण्यात आला आहे. एसटीचे विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांच्या म्हणण्यानुसार, नवीन बसस्थानकाचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यात शहराचे धार्मिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक महत्त्व प्रतिबिंबित होईल. स्थानिक आमदार सुलभा खोडके यांच्या माध्यमातून आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात वाढीव निधीची मागणी केली जाणार आहे. निधी मंजुरीनंतर लगेच कामाला सुरुवात केली जाईल.

# नासिर हुसेन अमरावती भूषण पुरस्काराने सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 17 )** – लाईफ डेव्हलपमेंट सोसायटीच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी लोकमत समाचारचे उपसंपादक आणि ज्येष्ठ गुन्हे रिपोर्टर नासिर हुसेन यांना अमरावती भूषण पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला.हा प्रतिष्ठित पुरस्कार जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सहायक सल्लागार मनोज वाडेकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते, त्यामध्ये प्रतिदिन व वृत्तकेसरीचे संपादक नानक आहुजा, सिटी न्यूज चॅनेलचे प्रबंध संपादक डॉ. चंदू सोजतिया, उद्योजक कैलास गिरोलकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव



प्रा. डॉ. अविनाश असनारे, द अ ?निमेशन बायोइंजिनिअरिंग कॉलेज ऑफ रिसर्च सेंटरचे संचालक विजय राऊत, समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया, आणि बिर्ला ओपन माइंड्स इंटरनॅशनल स्कूलचे संचालक सुधीर वाकोडे यांचा समावेश होता.

**निष्पक्ष पत्रकारितेचा सन्मान**

नासिर हुसेन यांनी आपल्या पत्रकारिता प्रवासात सदैव प्रामाणिकपणा आणि निष्पक्षता जपली आहे. त्यांच्या रिपोर्टिंगमुळे समाजात जागरूकता निर्माण झाली असून, अनेक महत्त्वाचे प्रश्न समोर आले आहेत. जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी त्यांच्या उल्लेखनीय कार्याची प्रशंसा करताना त्यांना समाजासाठी प्रेरणादायी पत्रकार म्हटले. सन्मान स्वीकारल्यानंतर नासिर हुसेन म्हणाले, हा पुरस्कार माझ्यासाठी एक मोठी जबाबदारी आहे. मी पुढेही सत्य आणि निष्पक्षतेसह समाजाची सेवा करत राहीन.त्यांच्या या सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, हा पुरस्कार सत्यशील आणि निर्भय पत्रकारितेचे प्रतीक मानला जात आहे.

# श्री क्षेत्र कौंडण्यपूर ते श्री क्षेत्र धामंत्री भव्य कलश यात्रा



**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा ( दि. 17 )** – तिर्थक्षेत्र नागेश्वर जोतीलिंग मंदिर धामंत्री श्री नागेश्वर महादेव संस्थान येथे महाशिवरात्री उत्सव निमित्त 19 फेब्रुवारी ला भव्य कलश यात्रा सकाळी 8 वा.येथून श्री क्षेत्र कौंडण्यपूर ते धामंत्री निघणार आहे. तेव्हा या भव्य कलश यात्रा करिता परिसरातील महिला भजनी मंडळ, वारकरी भजनी मंडळ यांनी श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे सहभागी होण्याची श्री नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री व समस्त ग्रामस्थ व पंचक्रोशीतील ग्रामवाशी यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन विश्वस्त कमेटी यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय अॅथलेटिक स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 17 )** – दि.23 व 24 फेब्रुवारी रोजी पंढरपूर येथे सोलापूर जिल्हा असोसिएशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे स्पर्धेसाठी अमरावती जिल्ह्यातील सर्व ज्युनिअर खेळाडूंची निवड करण्यात आली. अमरावती जिल्हा हौशी ?थलेटिक संघटनेच्या वतीने ही निवड करण्यात आली. त्यात शांती निकेतन, नूतन कन्या, वनिता समाज, मनीबाई गुजराती, रामकृष्ण क्रीडा भारतीय विद्यालया इत्यादी सभा ज्युनिअर खेळाडूंचा सहभाग होता. या खेळाडूंना दिनांक दहा ते वीस फेब्रुवारी काळात श्री हनुमान



व्यायाम प्रसारक मंडळाच्या ट्रॅकवर उत्तमचंद ठाकूर अनिता टि कुऱ्हे नवनीत सर सोहेल सर इत्यादींच्या मार्गदर्शन सुरू आहे. निवड झालेले विद्यार्थी शाळा विविध वयोगट विविध खेळाचे स्पर्धक मध्ये नक्ष भुयार श्रावणी खरावे रुद्र सगळे रौनक अंबाडेकर भव्य डिप्टे आरल ठाकरे गौरी पाटील कार्तिक डिप्टे रुद्रांश माकोडे मयूर वानखडे कृष्णा चौधरी यांचा समावेश आहे. सर्व स्पर्धकांचा गेट-टु-गेदर व बक्षीस वितरण ज्येष्ठ सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्ते डॉ. गोविंदराव कासट यांच्या हस्ते पदक प्रमाणपत्र व डॉ. कासट तर्फे एक पुस्तक पदान करून सत्कार करण्यात आला. यावेळी पलक वर्गामध्ये संजय बिबटे अमोल वानखडे किरण ताई जायले नीलिमा माकोडे आंबेडकर ताई सुविधा ठाकरे मनीषा माकोडे भुयारताई उमेश वैद्य विवेक सहस्त्रबुद्धे अनिता टी कुऱ्हे आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार चषक नागपूर येथे झालेल्या स्पर्धेत 5000 मीटर धावणे स्पर्धेत यश मिळवणारे मीनाक्षी सुनील खारपाटे व सर्व स्पर्धक आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व प्रशिक्षकांना देत आहे



# धामणगाव येथे तालुका स्तरीय शिक्षक सक्षमीकरण क्षमतावृध्दी प्रशिक्षण

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे ( दि. 17 )** – जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती, गटसाधनकेंद्र व समग्र शिक्षा अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे तालुकास्तरीय शिक्षक सक्षमीकरण क्षमतावृध्दी पाच दिवसीय प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्याच्या सोमवारला (ता.17) सुरूवात झाली.

या प्रशिक्षणाच्या औपचारिक उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटसमन्वयक धीरज जवळकार हे होते.तर यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी मोहन देशमुख,शेषराव चव्हाण,ज्योती राऊत,वैशाली लीलर्व्हे, प्रफुल्ल श्रीखंडे,अमोल येहुल,मयुरी देशमुख,अमोल निरडकर,रेखा कोकणे,श्रीकांत घुगे,पंकज धामसे,नागसेन रामटेके,राम चव्हाण,दिक्षा दिक्षीत,रविकांत पवार,वैभव सरोदे,गौरव खोंडे,हरिश संदोकार, संध्या जामकर,कलेश कांबळे,रविकिरण खवले व आदी उपस्थित होते. शिक्षकांच्या क्षमता वाढवून त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी या पाच दिवसीय प्रशिक्षणात एकुण सोळा विषयावर अंतर्गत चर्चा करुन शिक्षकांच्या क्षमता वाढवायच्या आहेत.शिक्षकांच्या ज्ञानात भर पडली व तो ज्ञान समृद्ध झाला. तरच तो विद्यार्थीचे ज्ञान वाढवून शकते. म्हणूनच हे प्रशिक्षण शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षीय यंत्रणेला फार उपयुक्त आहे. म्हणून या प्रशिक्षणाला सर्वांनी पुर्ण वेळ उपस्थितीत राहुन लाभ घ्यावा, असे आवाहन गटसमन्वयक धीरज जवळकार यांनी केले.प्रशिक्षण का व कशासाठी ? नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षकांनी अपडेट असावे. शिक्षक क्षमता समृद्ध असेल तरच तो शाळा स्तरावर विद्यार्थीसाठी काम करु शकेल, असे मार्गदर्शन साधनव्यक्ती शेषराव चव्हाण, ज्योती राऊत यांनी केले.

# बलात्कार करणारा मांत्रिक दिगांबर चव्हाण ला पोलीस कोठडी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – अचलपूर तालुक्यातील 20 वर्षीय विवाहितेवर लैंगिक अत्याचार करणारा मांत्रिक दिगांबर रतन चव्हाण महाराज (65, रा. मरोहा-कावसा, जि. अकोला) याला अटक करण्यात गाडगेनगर पोलिसांना अखेर यश आले. त्याला 14 फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली. शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर केले असता, त्याला न्यायाधीशांनी न्यायालयीन कोठडी सुनावली. %यापुढे तुझा गर्भपात होणार नाही, पोटही दुखणार नाही, असे म्हणत त्या मांत्रिकाने 20 वर्षीय विवाहितेवर लैंगिक अत्याचार केला होता. त्यापूर्वी तिच्या सर्वांगावरून लिंबू फिरवत त्याने अघोरी उपचार करण्याचा दावाही केला. 8 फेब्रुवारी

रोजी सकाळी 11.30 च्या सुमारास गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील त्या मांत्रिकाच्या बहिणीच्या घरी ही घटना घडली होती. याप्रकरणी, गाडगेनगर पोलिसांनी 9 फेब्रुवारी रोजी रात्री 11=53 वाजता आरोपी मांत्रिक दिगांबर रतन चव्हाण याच्याविरुद्ध बलात्कार व नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन अधिनियमातील कलम 2, 3 (2) या कलमान्वये

गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्याच्या बहिणीकडे त्याचा शोध घेतला. मात्र, तो लगेचच तेथून पसार झाला. पोलिसांनी त्याच्या राहत्या गावासह पथ्रोट, दहिहांडा, जांभा, म्हैसांग येथे शोध घेतला. दरम्यान, तो अमरावतीतील एका आप्ताच्या शेतशिवारात दडल्याची माहिती मिळताच त्याच्या नातेवाइकांनी त्याचा शोध घेतला तथा त्याला 14 फेब्रुवारी रोजी गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन केले.(अंधश्रद्धा निर्मूलन कायदा) गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी पसार झालेल्या मांत्रिकाचा शोध चालविला होता. 20 वर्षीय पीडिता ही अचलपूर तालुक्यातील एका गावची रहिवासी आहे. तिचे गतवर्षी एप्रिलमध्ये लग्न झाले. 5 फेब्रुवारी रोजी नात्यात असलेला दिगांबर चव्हाण महाराज हा तिच्या घरी पोहोचला. तुला बाहेरचे तीन लोक लागले आहेत, अशी बतावणी केली, त्यावेळी आरोपीने पीडितेच्या सर्वांगावर लिंबू घासले. पंचरंगी दोरा बांधला तथा गळ्यात बांधायला तावीजदेखील दिला. 8 फेब्रुवारी रोजी सकाळी पीडिता व तिचे सासरे मांत्रिक आरोपीच्या बहिणीच्या घरी आले, त्यावेळी आरोपीने तिच्यावर लैंगिक बळजबरी केली होती.

# अबॅकस स्पर्धेमध्ये चिमुकल्यांची भरारी

- अचुक व जलद गतीने गणितमध्ये प्राप्त केले प्राविण्य
- बक्षिस, प्रमाणपत्र व ट्रॉफी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – गणितीय कौशल्य आत्मसात करणार्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अॅबकसच्या माध्यमातून उच्च भरारी घेतली आहे. अचुक व जलद गतीने गणिते सोडून विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले आहे. काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या अबॅकस स्पर्धेमध्ये रुद्राय अबॅकस अॅन्ड वैदिक मॅथ इन्स्टीट्युटच्या 25 विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. रविवारी (दि.16) रंगारी गल्ली स्थित दादीका भवन येथील कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस, प्रमाणपत्रक्ष व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

अबॅकस स्पर्धेमध्ये मेघा माईन्ड इन्स्टीट्युटच्या माध्यमातून रुद्राय अबॅकस अॅन्ड वैदिक मॅथ इन्स्टीट्युटच्या 5 विद्यार्थ्यांनी फर्स्ट रॅन्कमध्ये प्राविण प्राप्त केले आहे. अचुक व जलद गतीने गणितांमध्ये या विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले आहे. अमरावतीत गेल्या काही दिवसांपूर्वीच अबॅकसची परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये परीक्षांचे निकाल नुकतेच घोषीत



### हे आहेत अबॅकसमधिल गुणवंत

अॅबकसमधील रॅन्क 1 मध्ये आर्या राठी, नैतिका हरणखेडे, धैर्य शेटे, अंकुश घोराई, वत्सल चव्हाण, रॅन्क 2 मध्ये ह्यदया राठी, प्रभु बांबल, उत्कर्ष बाबरेकर, रॅन्क 3 मध्ये आर्यश गुप्ता, विष्णुराज पाटील, मृणमयी गुल्हाने, स्वराज घोंगाडे, अनविता शेष, मीस्टी रावल, तनिशा संत्राआ, देवांशू बानस्कर, अर्नव मुंदे, रौनीत ढाकुलकर, ध्रुव देशमुख, ध्रुव रहागडाले, शार्यन सामंता, वरद गुल्हाने, अनिश शेष, सायना मलिक, मायरा फातेमा यांचा समावेश आहे. या चिमुकल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

झाले असून, यामध्ये रुद्राय अॅबकस अॅन्ड वैदिक इन्स्टीट्युटचे विद्यार्थी गुणवंत ठरले आहे. यामध्ये रॅन्क 1 मध्ये 5, तर रॅन्क 2 मध्ये 3 आणि रॅन्क 3 मध्ये 14 विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. या प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार रंगारी गल्लीतील दादी का भवन येथील सभागृहात आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून मेघा माईड इन्स्टीट्युटचे मॅनेजिंग डायरेक्टर मनोज जावरे, रुद्राय अॅबकस अॅन्ड वैदिक मॅथ इन्स्टीट्युटच्या संचालिका श्रध्दा विपीन ढाकुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात मनोज जावरे व श्रध्दा ढाकुलकर यांनी विद्यार्थ्यांसह पालकांना मार्गदर्शन केले. अबॅकसच्या माध्यमातून मुलांची बौध्दीक क्षमता कशी वाढते, यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्राजक्ता श्रीवास्तव यांनी केले, तर आभार श्रध्दा विपीन ढाकुलकर यांनी मानले.

## आत्महत्येची धमकी देणाऱ्या रोमियोवर गुन्हा

**अचलपूर** – एका 32 वर्षीय महिलेचा वारंवार पाठलाग करून माझ्यावर प्रेम कर, माझ्याशी प्रेमसंबंध ठेव, अन्यथा आत्महत्या करतो अन् तुला फसवतो, अशी धमकी देण्यात आली. 14 फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाईन डेला सरमसपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी 14 फेब्रुवारी रोजी रात्री आरोपी नरेंद्र गोरडे (42, रा. खानापूर, ता. अचलपूर) याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. एफआयआरनुसार, 32 वर्षीय फिर्यादी महिला ही 14 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5 वाजण्याच्या सुमारास अंजनगाव येथून कामावरून घरी परत येत होती.



# सीए शाखेत क्रीडासह सांस्कृतिक महोत्सव

## विद्यार्थी व सदस्यांचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – स्थानिक सीए शाखेच्या वतीने नुकतेच चार्टर्ड अकाउंटंट विद्यार्थी आणि सदस्यांसाठी क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. क्रिकेट, बुद्धिबळ, कॅरम आणि बॅडमिंटन या क्रीडा स्पर्धांमध्ये सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला.

टर्फ इनडोअर मैदानावर खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट स्पर्धांमध्ये लिलावावर आधारित खेळाडू निवड प्रक्रिया घेण्यात आली. सीए केशव सोनी आणि सीए तपेश मुंधरा यांच्या 'स्लो हॉर्स' संघाने चॅम्पियन बनल्याने स्पर्धेचा समारोप झाला, क्रिकेटमधील वैयक्तिक पुरस्कारांमध्ये दिव्या डागवालेची सर्वोत्कृष्ट गोलंदाज म्हणून, कृष्णा अग्रवालची सर्वोत्तम फलंदाज म्हणून आणि रईश साहूची स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. बॅडमिंटनमध्ये सीए राहुल बत्रा, सीए मयुरी भट्ट, कृष्णा अग्रवाल आणि इशिका खुराना हे विजेते ठरले. तर कॅरममध्ये कृष्णा अग्रवाल आणि सीए मोहित आहुजा यांनी चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. शारिरीक तंदुरुस्ती सोबतच, क्रीडा सप्ताहाने सहभागामधील सौहार्द आणि सांघिक कार्याला प्रोत्साहन दिले. क्रीडा उपक्रमांनंतर, सर्जनशीलता आणि मनोरंजनासह सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता झाली. यामध्ये प्रतिभावान विद्यार्थ्यांच्या नृत्य, संगीत आणि स्टँडअप कॉमेडी सादरीकरणाचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात सीए शाखेच्या अध्यक्षा अनुपमा लड्ढा यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. शाखा सचिव दिव्या त्रिकोटी यांनी उद्घाटनपर भाषण केले, कार्यक्रमाची सांगता हर्ष शर्मा यांनी आभार मानून सीए हर्ष शर्मा, सीए अभय साहू आणि सीए संदीप सुराणा यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कार्यक्रम यशस्वी झाला. सदर कार्यक्रम उपस्थित सर्वांसाठी एक अविस्मरणीय अनुभव बनला. क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाने सदस्यांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी केवळ व्यासपीठच दिले नाही. तर सीए समुदायातील बंधही मजबूत केले. या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले आणि सीए व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांमध्ये सहभाग, ऐक्य आणि उत्कृष्टता वाढवण्यासाठी हा एक मैलाचा दगड म्हणून लक्षात ठेवला जाईल.

# अमरावती जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू

## 14 विभागांना मागणीपत्र सादर करण्याचे कॅफोंचे निर्देश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 17 )** – अमरावती जिल्हा परिषदेने आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू केली आहे. मुख्य वित्त व लेखाधिकारी (कॅफो) अश्विनी मारणे यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व 14 विभागांना 2025-26 च्या अर्थसंकल्पासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम, समाज कल्याण, महिला व बालविकास, कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य, शिक्षण, सामान्य प्रशासन, पंचायत, पाणी पुरवठा, डीआरडीए, पाणी व स्वच्छता मिशन आदी विभागांचा समावेश आहे. प्रत्येक विभागाने आपल्या वार्षिक जमा खर्चाचे विवरण सादर करणे अपेक्षित आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींची नियुक्ती न झाल्याने प्रशासकीय




प्रमुखांमार्फत कारभार चालवला जात आहे. त्यामुळे अर्थसंकल्पाला अंतिम मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय प्रमुखांकडे असतील. कॅफो मारणे यांच्या म्हणण्यानुसार, फेब्रुवारी अखेरपर्यंत सर्व विभागांकडून मागण्या प्राप्त होतील आणि त्यानंतर जिल्हा परिषदेचा एकत्रित जिल्हा परिषद अमरावती अर्थसंकल्प तयार करण्यात येईल. महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि नगरपंचायतींसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्च महिना संपण्यापूर्वी आपला अर्थसंकल्प मंजूर करून घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्व संस्थांमध्ये अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया जोरात सुरू आहे.

# एकाच दिवशी 57.41 लाखांची कर वसुली

## उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी दिली मालमत्ता कर शिबिराला भेट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 ) –** नागरिकांना मालमत्ता कर भरणे सोयीचे व्हावे आणि कर भरण्यासंदर्भात जनजागृती व्हावी, या उद्देशाने झोनअंतर्गत वॉर्डावॉर्डांत विविध ठिकाणी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले. मोठ्या प्रमाणात नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. यामध्ये 15 फेब्रुवारी रोजी विविध परिसरातून 57 लाख 41 हजार रुपये कर वसुली करण्यात आला. यावेळी उपायुक्त नरेंद्र वानखडेंनी पाचही झोनमधील शिबिरस्थळी भेट




देऊन कर वसुलीचा आढावा घेतला.

झोननिहाय सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांना ऑटो फिरवून कर भरण्यासाठी आवाहनही करण्यात आले. या शिबिरांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यासाठी झोननिहाय सर्व नागरिकांना कर भरण्यासाठी उद्युक्त केले. मनपा झोनच्या सहायक आयुक्त यांच्या मार्गदर्शनात कर विभागाच्या अधिकारी यांच्यासह कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. सदर शिबिराला मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी भेट दिली. मालमत्ता कर मुदतीत भरणा करण्याचे आवाहन महानगरपालिकेकडून सातत्याने केले जात आहे. सन 2024-25 या आर्थिक वर्षाचा मालमत्ता करभरणा करण्यासाठी 31 मार्च, हा अंतिम दिवस आहे. सर्व मालमत्ताधारकांनी या मुदतीपूर्वी मालमत्ता करभरणा न केल्यास संबंधित मालमत्ताधारकांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

# सालबर्डीसाठी धावणार 950 बसेस

## 23 फेब्रुवारी ते 2 मार्चपर्यंत लालपरी यात्रेकरूंच्या सेवेत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.17) –** महाशिवरात्रीनिमित्त जिल्ह्यातील सालबर्डी व कोंडेश्वर येथे भक्तांची गर्दी पाहता एसटी महामंडळाकडून यात्रेकरुंच्या सुविधेकरिता लालपरी उपलब्ध करून

देण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत बस फेऱ्याची संख्या वाढविण्यात आली असून 23 फेब्रुवारीपासून 2 मार्चपर्यंत लालपरी यात्रेकरूंच्या सेवेत उपलब्ध राहणार आहे. महाशिवरात्री निमित्त जिल्ह्यातील सालबर्डीला विदर्भातील हजारो भक्तांचा जनसागर लोटतो. प्रवासाच्या सुविधेअभावी भक्तांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. जिल्ह्यातील 8 बसस्थानकामधून




### सर्व सवलती लागू

महामंडळाने इतर प्रवासात महिलांना भाड्यात 50 टक्के सवलत, यासह ज्येष्ठ व अमृत नागरिकांकरिता सुध्दा जी सवलत दिली आहे, ती सर्व सवलत या यात्रा महोत्सवा मध्येसुध्दा यात्रेकरूंना देण्यात येणार आहे.

प्रत्येकी 10 बसेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. गतवर्षी 873 बस फेऱ्या करण्यात आल्या होत्या. त्यातून महामंडळाला 22 लाखांचे उत्पन्न मिळाले होते. यावर्षी बस फेऱ्या वाढविण्यात आल्या असून 950 करण्यात आल्या आहेत. त्यातून राज्य मार्ग परिवहन महामंडळाला 32 लाख उत्पन्न अपेक्षित आहे.

# श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात बहारदार कविसंमेलन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 ) –** स्त्रीत्वाची भावना आपल्या कवितेतून अलगदपणे टिपणारी बी. एड्. स्नातकची विद्यार्थिनी वैष्णवी गोदावरी नानासाहेब सानप यांनी श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे झालेल्या प्रतिथयश कवींच्या कविसंमेलनात माझी पाळी ही कविता म्हणून उपस्थित सर्वांची वाहवा मिळविली. संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमांतर्गत नाट्य व कलाशिक्षण कार्यशाळेत साहित्यिक उपक्रम म्हणून महाविद्यालयात कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवयित्री रजनी राठी होत्या, तर निमंत्रित कवी म्हणून विष्णू सोळंके, सुप्रसिद्ध हास्यकवी मनोज दोन्ती मद्रासी, पाच विद्यापीठांच्या मराठी विषयातील अभ्यासक्रमात कवितांचा समावेश असलेले कवी प्रा. डॉ. अजय खडसे, सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी राजेश महल्ले, अहिसासच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा कवयित्री शिला डोंगरे, आंबेडकरी विद्रोही कवी शिवा प्रधान, मराठी- हिंदी शायरी प्रस्तुत करणारे कवी हनुमान गुजर, सामाजिक व प्रबोधनात्मक रीळ निर्माते कवी चंद्रशेखर तरारे, इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक कवी नरेंद्र अघमे व आपापल्या क्षेत्रातील भारदस्त कवींसह महाविद्यालयातील प्रा. डॉ. संजय खडसे, प्रा. डॉ. किशोर क्षत्रिय, वैष्णवी सानप, भारती अंभोरे, शुभम ब्रह्मटेके, दीपक सोनवणे आदी कवींनी आपल्या रचना सादर करून कविसंमेलनात सहभाग नोंदविला. याप्रसंगी कवी विष्णू सोळंके, यांनी तांडा, शिला डोंगरे यांनी औरत, कवी राजेश महल्ले, यांनी माय गाव, डॉ. अजय खडसे गुलदस्ता, नरेंद्र अघ पैसे, शिवा प्रधान रक्ताचे संदर्भ, रजनी राठी यांनी ओ मेरे गुरुदेव, चंद्रशेखर तरारे आसमंत, हनुमान गुजर गझल, डॉ. संजय खडसे ऊठ माणसा, भारती अंभोरे कॉलेजची पोर, डॉ. किशोर क्षत्रिय यांनी विराणी तर हास्यकवी मनोज दोन्ती मद्रासी यांनी सभागृहात आपले अनेक विनोदी किस्से सांगून कविसंमेलनात बहार आणली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व कवींनी संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला वंदन केले.

# शुक्रवार बाजारातून मोबाइल लांबविला

**अमरावती –** शुक्रवार बाजारातून एका नागरिकाच्या खिशातील मोबाइल लांबविण्यात आला. ही घटना 15 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. तपोवन परिसरातील छाया कॉलनी येथील रहिवासी मोहन देवीदास जाधव (40) हे शुक्रवार बाजारात गेले होते. एका दुकानातून भाजीपाला घेत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील 20 हजार रुपये किमतीचा मोबाइल लांबविला. ही बाब लक्षात आल्यावर मोहन जाधव यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# छत्रीतलाव परिसरातून दुचाकी लंपास

**अमरावती –** छत्रीतलाव परिसरातून दुचाकी लंपास करण्यात आली. ही घटना 15 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. वडरगाव येथील रहिवासी मंगेश कृष्णराव चांगोले (22) हा 14 फेब्रुवारी रोजी दुपारी छत्रीतलाव येथे गेला होता. त्यावेळी त्याने आपली दुचाकी क्रमांक एमएच 27 बीएन 3995 ही तेथील उद्यानाच्या गेटसमोर उभी केली होती. सदर दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही बाब लक्षात आल्यावर मंगेशने राजापेठ ठाण्यात तक्रार दाखल केली.

# धामणगाव तालुक्यात संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगांव रेल्वे, ( दि. 17 ) –** तालुक्यात संत सेवालाल महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.दरम्यान शहरात प्रथमच भजन, कीर्तन संत सेवालाल महाराजांच्या नामाचा जयघोष करीत रथयात्रेसह मिरवणूक काढण्यात आली.यात पारंपारिक पोशाखात महिला डोक्यावर कलश घेऊन सहभागी झाल्या होत्या.

तालुक्यात अनेक ठिकाणी संत सेवालाल महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन अनेक ठिकाणी करण्यात आले. प्रथमच धामणगाव येथे संत सेवालाल महाराज यांची रथयात्रेसह मिरवणूक काढण्यात आली.ही मिरवणूक माताजी मंदिर, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ,संत गजानन महाराज मंदिर ते तुळजा भवानी माता मंदिरापर्यंत ही मिरवणूक निघाली. यावेळी मोठ्या संख्येत बंजारा बांधव यावेळी पारंपरिक वेशभुषेत महिला ने डोक्यावर कलश घेवुन महिलानी सहभाग घेतला होता तसेच, पुरुष ,बालक बालिका व इतर समाज बांधवही मिरवणुकीमध्ये सामील झाले होते. भजन, कीर्तन,संत श्री सेवालाल महाराजांच्या नावाचा जयघोष करीत मिरवणूक काढण्यात आली.

दरम्यान येथील तुळजाई मंदिरात झालेल्या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायक प्रमुख वसंत राठोड हे होते. प्रमुख अतिथी म्हणून दत्तापुर येथील ठाणेदार गिरीश ताथोड, कारभारी अंबादास जाधव, शकील अहमद, मंगेश राजनकर, गोविंद मानकर, पुंडलिक मेश्राम, संतोष वाघमारे, ज्येष्ठ नागरिक कनिराम आडे व आदी उपस्थित होते.संचालन सचिन चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर राठोड यांनी मानले.यावेळी श्री मेघावत, अरुण आडे, शेषराव चव्हाण, मधुकर राठोड, सेवादास राठोड, विजय आडे, विष्णू राठोड, सचिन चव्हाण, रवी राठोड, श्रीकृष्ण चव्हाण, अरुण पवार, बाळू राठोड, जीवन पवार,राजू पवार, किशोर जाधव, सतीश राठोड, प्रदीप पवार, डी.जे. राठोड, शेषराव चव्हाण, रवी पवार, निरंजन आडे, भगवान चव्हाण, अरुण चव्हाण, रवी पवार, विलास राठोड, तेजस राठोड, ज्ञानेश्वर राठोड, नामदेव जाधव, बलदेव चव्हाण, शक्ति राठोड,रवी चव्हाण,नामदेव राठोड,के.टी.चव्हाण, जगदीश राठोड,गणेश राठोड,राम राठोड यांच्यासह धामणगाव रेल्वे तांड्यातील सर्व बंजारा बांधव व भगिनी प्रामुख्याने उपस्थित होते.

### सत्य, सेवाभाव व त्यागाचे प्रतीक संत श्री सेवालाल महाराज - गिरीश ताथोड

सत्य,सेवाभाव व त्याग अशी मानवतावादी शिकवण देणारे, भक्ती व परमार्थाच्या मार्गाने समाजात जागृती निर्माण करणारे संत श्री सेवालाल महाराज होते.बुद्धीप्रामाण्यवादी संत अशी त्यांची ओळख होती. त्यांनी मार्ग चुकलेल्या भक्तांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी जीवनभर मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांनी दिलेली शिकवण आजही समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहे. त्यांचे विचार समानता, पर्यावरणसंवर्धन, माणुसकी, शिक्षण आणि समाजातील एकात्मता यांवर आधारलेले होते. त्यांनी दिलेली संघर्षमय आणि तत्त्वनिष्ठ जीवनाची शिकवण संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहेत. असे ठाणेदार गिरीश ताथोड म्हणाले.

# राष्ट्रीय विद्यालयातील वर्गमित्र 44 वर्षानंतर आले एकत्र

## 1980 च्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि.17)-** शालेय जीवनात एकाच वर्गात शिकलेले मित्र कधीतरी एकत्र यावे आणि जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळावा, याची ओढ प्रत्येकालाच लागलेली असते. हा योग राष्ट्रीय विद्यालयातील 1980 सालच्या दहावीच्या वर्गात एकत्र शिकलेल्या वर्गमित्रांच्या बाबतीत जुळून आला. शाळेत आयोजित स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने तब्बल 44 वर्षानंतर हे मित्र एकत्र आलेत. अचलपूर-अंजनगाव मार्गावरील बरसाना फार्म हाऊस येथे या जुन्या मित्र-मैत्रिणींचा स्नेहमिलन सोहळा दोन दिवस उत्साहात पार पडला. मोबाईल व समाज माध्यमांवरून संपर्कात असलेले मित्र-मैत्रिणी प्रत्यक्ष भेटल्यानंतर त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. हा सुवर्णयोग मुकुंद अग्रवाल, विनोद अग्रवाल, विवेक पांडे, नितीन करूले, विठ्ठल हजारे, रामभरोसे गौर, पदमा दावंडे, सुचिता डहाके, मनीषा वाईकर व अन्य मित्रांनी जळून आणला. यापैकी अनेक मित्र गुजरात, मुंबई, पुणे, लोणावळा, नागपूर व अन्य मोठ्या शहरात वास्तव्यास आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या मूळ गावी बालपणीच्या मित्रांसोबत एकत्र येऊन त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. संगीत रजनीत या मित्र-मैत्रिणींनी गीत गायन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुकुंद अग्रवाल हे होते. प्रदीप शुक्ला प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्वांनी कुटुंबीयांसह एकमेकांना परिचय दिला. यावेळी विनोद अग्रवाल, गोपाल विंचुरकर, सौ. मुगल, सौ. खडके, सौ. शुक्ला यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विठ्ठल हजारे यांनी तर संचालन सुचिता डहाके यांनी केले. दोन दिवसाच्या कार्यक्रमात भोजन व्यवस्था मुकुंद अग्रवाल व सौ.अग्रवाल यांनी सांभाळली.

# मेळघाट बर्ड काऊंटमध्ये अनेक प्रजातींच्या पक्षांचे दर्शन

## पक्षी सर्वेक्षणाचे सेमाडोह येथे पार पडले उद्घाटन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 ) –** मेळघाट हा भारतातील एक सर्वात जुना आणि आकाराने सर्वात मोठा असा व्याघ्र प्रकल्प आहे. मागील 2023-24 मध्ये या व्याघ्र प्रकल्पाने आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले आहे. सातपुडा पर्वत रांगेतील एक सर्वात संपन्न जंगल असलेला मेळघाट हे उंच पहाडी व दऱ्या-खोऱ्यांनी युक्त असा प्रदेश आहे. सुमारे 3000 चौरस किमी इतका विस्तार असलेल्या मेळघाटात विविध प्रकारचे अधिवास आढळत असले, तरी येथील जंगल हे शुष्क पानगळी प्रकारचे आहे. अधिवास विविधतेमुळे येथील पक्षी विविधता सुद्धा संपन्न आहे. या पक्षी विविधतेचा अभ्यास करण्यासाठी मेळघाटात 13 ते 163 फेब्रुवारीदरम्यान चार दिवसीय बर्ड काऊंटचे (पक्षी सर्वेक्षण) आयोजन करण्यात आले होते. पक्षी निरीक्षणात अनेक पक्षी अभ्यासकांनी सहभाग घेऊन बर्ड काऊन्टींग केली.

### 2023 मध्ये मेळघाटात 11 नवीन पक्ष्यांची भर

“यापूर्वी जानेवारी 2023 मध्ये पार पडलेल्या पहिल्या पक्षी नोंदणी कार्यक्रमात मेळघाटच्या यादीत 11 नवीन पक्ष्यांची भर पडली होती. तसेच दुसऱ्या बर्ड सर्व्हे मध्ये सुद्धा दोन पक्ष्यांची नव्याने नोंद झाली होती. मेळघाटचे पक्षीविश्व संपन्न आहे. या ठिकाणी आजवर 308 पक्षी प्रजातींची नोंद झाली असून यामध्ये अनेक दुर्मिळ व महत्वपूर्ण पक्षी प्रजातींचा समावेश आहे. सध्या हिवाळ्याचा अखेरचा काळ असल्याने स्थलांतरित पक्षी परतीच्या मार्गावर लागण्याची ही वेळ आहे. सातपुडा हा स्थलांतरासाठीचा महत्वाचा भ्रमणमार्ग असल्याने काही महत्वाच्या प्रजातींची त्यांच्या प्रवासादरम्यान नोंदी होण्याची सुद्धा शक्यता आहे.

**डॉ. जयंत वडतकर,**
**मेळघाट पक्षी विश्वाचे अभ्यासक तथा मानद वन्यजीव रक्षक.**

### पक्षी विश्वात आणखी प्रजातींची भर पडेल

या तिसऱ्या बर्ड काउंटचे 13 फेब्रुवारी रोजी सेमाडोह येथे उद्घाटन पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेळघाटचे विभागीय वनाधिकारी मनोजकुमार खैरनार यांची उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानद वन्यजीव रक्षक तथा पक्षी अभ्यासक डॉ. जयंत वडतकर तसेच सहा. वनसंरक्षक वैभव घार्गे (सिपना), सहा. वनसंरक्षक पद्माकर मोगरे (गुगामल) व सहा. वनसंरक्षक राजेश रत्नपारखी (मेळघाट वन्यजीव) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक वनसंरक्षक वैभव घार्गे यांनी केले. त्यानंतर मेळघाट पक्षी विश्वाचे अभ्यासक डॉ. जयंत वडतकर यांनी मेळघाटातील पक्ष्यांच्या अभ्यासाचा इतिहास, मेळघाटची पक्षी जैवविविधता तसेच इबर्ड ट्रीप रिपोर्ट या बाबत आपल्या सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. विभागीय वनाधिकारी मनोजकुमार खैरनार यांनी सर्व सहभागींचे स्वागत करून मेळघाटच्या या पक्षी अभ्यास कार्यक्रमातून मेळघाटच्या पक्षी विविधतेवर आणखी प्रकाश टाकला जाऊन येथील पक्षी विश्वात आणखी प्रजातींची भर पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनाक्षी राजपूत यांनी केले. आयोजन समिती सदस्य श्री अतुल तिखे यांनी आभार प्रदर्शन केले.

### 50 पक्षी अभ्यासक सहभागी

या सर्वेक्षण कार्यक्रमात चार राज्यातील सुमारे 50 पक्षी अभ्यासक सहभागी झाले असून व्याघ्र प्रकल्पातील गुगामल, सिपना व मेळघाट वन्यजीव विभागातील सुमारे 25 कॅम्प वर हे पक्षी अभ्यासक उपस्थित होते या सर्वेक्षण कार्यक्रमातील पक्ष्यांच्या नोंदी इबर्ड या संकेतस्थळावर टाकल्या जाणार असून या सर्व नोंदी ट्रीप रिपोर्टमध्ये नोंदविल्या जाणार आहेत.

### यांचे लाभले मार्गदर्शन व सहकार्य

सदर बर्ड सर्वे कार्यक्रमासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रासंचालक आदर्श रेड्डी यांचे मार्गदर्शनात आखणीसाठी स्वप्नील बांगडे, अतुल तिखे, दीप तराळ यांनी परिश्रम घेतले असून उद्घाटन कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी उपवनसंरक्षक दिव्याभारती तसेच विभागीय वनाधिकारी मनोजकुमार खैरनार यांचे मार्गदर्शनात वनपाल प्रदीप तडखनकर, अतुल तिखे, ज्ञानदीप तराळ, शुभम ठवरे यांनी परिश्रम घेतलेत. सदर कार्यक्रमाच्या आखणीसाठी डॉ. जयंत वडतकर, किरण मोरे, प्रा.डॉ चेतना उगले, मनिष ढाकुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# कृषी कार्यालयाच्या प्रशिक्षण हॉलला आग

## कागदपत्रे, फर्निचर, रिकाम्या थैल्या झाल्या खाक





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि. 17)-** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (एसएओ) कार्यालयातील प्रशिक्षण सभागृहाला रविवारी 16 फेब्रुवारीला सायंकाळी आग लागली. या आगीत जुनी कागदपत्रे, फर्निचर, कापूस बियाणांच्या रिकाम्या थैल्या जळून खाक झाल्या. आगीचे नेमके कारण कळू शकले नाही. मात्र शॉक सर्कीटमुळे ही आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. रविवारी सायंकाळी 6 ते 7च्या दरम्यान ही घटना घडली. मनपा अग्निशमन दलाच्या तीन बंबांनी ही आग आटोक्यात आणली. परंतु तत्पूर्वी सभागृहात ठेवलेले साहित्य जळून खाक झाले होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात शंभर आसन क्षमतेचे प्रशिक्षण सभागृह आहे. कृषी महोत्सव सुरू असल्याने सर्व कर्मचारी तिथे कार्यरत आहेत. त्यामुळे सभागृहाला आग कशी लागली हे कळले नाही. जुनी कागदपत्रे, फर्निचर, काही कॉटन बॅग आदी साहित्य होते. कोणती कागदपत्रे जळून खाक झाली ते सोमवारी कळेल. सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांना तशा सूचना देण्यात आल्या आहे. या घटनेची तक्रारही पोलिस ठाण्यात देण्यात येईल असे राहुल सातपुते, एसएओ. यांनी सांगितले.

# बिनाबर्फ रस महाग का? अन्न व औषध प्रशासनाचे तपासणीकडे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.17 )–** उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरासह ग्रामीण भागात विविध रस्त्यांवर, वर्दळीच्या ठिकाणी रसवंती गृहे थाटायला सुरुवात झाली आहे. मात्र, या ठिकाणी वापरले जाणारे पाणी शुद्ध आहे का? रसामध्ये टाकण्यात येणारा बर्फ शुद्ध पाण्यापासून तयार केला जातो का?, याबाबतच्या तपासणीकडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. दरम्यान, शक्यतो बिनाबर्फाचा रस पिणे कधीही आरोग्यासाठी चांगले असते.

व्यावसायिकही चार महिन्यांचे सिझन म्हणून परवानगीशिवाय हा व्यवसाय सुरू करीत आहे. तालुक्यात अशी रसवंतीची दुकाने थाटली असताना, बऱ्याच व्यावसायिकांना रितसर परवानगीचा विसर पडल्याचे दिसून येते. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शरीरातील दाहकता कमी करण्यासाठी विविध प्रकारच्या थंड पेयांची



दुकाने थाटली जातात. यात आईस्क्रीम, लस्सी, कोल्ड्रिंग, लिंबूपाणी आणि रसवंती इत्यादी दुकानाचा यात समावेश होतो. यातील लिंबू पाणी आणि रसवंती या ठिकाणी दिवसभरात मोठ्या प्रमाणावर बर्फाचा वापर होत आहे.

## बर्फाची शुद्धता तपासली जाते का ?

खाण्यासाठी असलेला बर्फ शुद्ध पाण्यापासुन बनविणे बंधनकारक आहे. मात्र असा बर्फ महाग असल्याने अनेकदा थंड पेय विक्रेते स्वस्त पडणारा बर्फ खरेदी करतात.

## ...तर पोटाचा त्रास

अस्वच्छ पाण्यापासून तयार केलेला बर्फ पोटात गेल्यास घसा दुखी, जुलाब, तसेच पोटात इंन्फेक्शन होऊन पोट दुखीची समस्या उद्भवू शकते. सर्दी–खोकल्याचींही बाधा होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी रसवंतीगृहावर रस पिताना या गोष्टींची खरबदारी घेणे गरजेचे आहे.

## प्रशासनाची परवानगी नाहीच

वास्तविक रसवंतीचा व्यवसाय सुरू कारण्यापूर्वी नियमाप्रमाणे अन्न व औषध प्रशासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, या विभागाशी संबंधित अनेक व्यवसाय परवानगी न घेताच सर्रास हा व्यवसाय सुरू करतात. या व्यावसायिकांची कधी अन्न व औषध विभागाने तपासणी केल्याची अथवा कार्यवाही केल्याचेही ऐकण्यात नाही. मोजक्या दिवसांचा व्यवसाय असल्यानेही याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होते.

## बिना बर्फाचा रस महाग का

अनेकदा रस घेताना तो बर्फाचा की विना बर्फाचा हवा, असे विचारले जाते, बर्फ वितळून त्याचे पाणी होते. त्यामुळे उसाच्या एका कांडक्यात पाच ग्लास रस तयार होतो. याउलट बिना बर्फाच्या रसासाठी जास्त ऊस लागतो. सोबतच अद्रक, लिंबू वेगळे टाकावे लागते. त्यामुळे बिना बर्फ रस बर्फाच्या रसापेक्षा महाग विकला जातो. आणि शरीरासाठीही तो चांगला असतो.

## बर्फाचा रस 10 रुपयाला हाफ, 15 फुल

सध्या बाजारात थंडपेयांची मागणी वाढत आहे. त्यातही उसाच्या रसाला नागरिकांची पसंती आहे. बर्फाचा रस एक छोटा ग्लास दहा रुपयाला मिळतो. तर बिना बर्फाचा रस एक छोटा ग्लास 15 रुपयाला मिळतो. उसाच्या तुलनेत बर्फ स्वस्त असल्याने हा फरक आहे.

## बर्फ टाकलेलाच रस हवाय !

- उन्हाची दाहकता जेव्हा वाढते, तेव्हा थंड पिण्याकडे जवळपास सर्वच व्यक्तीचा कल असतो.
- अशावेळी नागरिक बर्फ टाकलेला उसाचा रस, लस्सी, लिंबूपाणी पिण्यासाठी पसंती देतात.

# मांडवा येथे पेसा ग्रामकोष समितीची स्थापना

### ग्राम विकासाला मिळणार नवी दिशा ■ ग्रामसभेत सर्वानुमते निर्णय



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.17 )–** धारणी तालुक्यातील मांडवा बासपानी या गावात नवीन पेसा ग्रामकोष समितीची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामपंचायतच्या नुकत्याच पार पडलेल्या ग्रामसभेत सर्वानुमते ही समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे मांडवा गावाच्या विकासाला नवीन दिशा मिळणार असून त्यामुळे ग्रामस्थांमध्ये उत्साह संचारला आहे.

सरपंचांच्या अध्यक्षतेखाली आणि ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या ग्रामसभेमध्ये ग्रामविकास पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामकोष समितीच्या कार्य योजनेवर सखोल चर्चा करण्यात आली.

समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पारंपारिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. समितीच्या अध्यक्ष, सचिव आणि सदस्यांनी ग्रामविकासाला सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक व निष्ठेने कार्य करण्याचा संकल्प यावेळी केला.

पेसा कायदा हा 1996 च्या 73 व्या घटनादुरुस्तीचा एक भाग आहे. तो अनुसूचित क्षेत्रांमध्ये ग्रामसभांना विशेष अधिकार प्रदान करतो. या कायद्याअंतर्गत ग्रामसभांना जल जंगल आणि जमीन अधिकार, स्थानिक स्वराज्याचा अधिकार, खनिज संपत्ती वरील नियंत्रण, ग्रामविकास योजना तयार करण्याचा अधिकार, व्यक्तिगत आणि सामूहिक जीवन हक्कांचे संरक्षण, विकास प्रकल्प व औद्योगिक प्रकल्पासाठी मंजुरी देण्याचा अधिकार, परंपरागत संसाधनांचे व्यवस्थापन, शैक्षणिक आणि सांस्कृतिक हक्कांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि परंपरा व्यवस्थापन, ग्रामसभेचा आर्थिक नियंत्रणावर अधिकार आदी हक्क प्रदान करतो.

ग्रामकोष समितीच्या स्थापनेमुळे ग्रामकोषाच्या प्रभावी वापरातून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. या निधीतून पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि कृषी विकासासाठी मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. ग्रामस्थांनीही समितीला संपूर्ण सहकार्य करण्याचे वचन दिले. समितीच्या अध्यक्षपदी माजी सैनिक विजय डहाके यांची निवड करण्यात आली. समितीमध्ये उपाध्यक्ष अनिल चतुर, सचिव गजानन हटवार तर सदस्य म्हणून नंदू डहाके, विजय कासदेकर, अरुण धुर्वे, जयश्री मावसकर, रेखा धांडे, सविता कासदेकर, रजनी दहीकर, लता मावसकर, प्रल्हाद चतुर यांचा समावेश करण्यात आला आहे. गत पाच वर्षात पेसा समितीने गावाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

अमरलाल कासदेकर हे पेसा समितीचे पहिले अध्यक्ष होते. महिला सशक्तीकरण व विकासामध्ये माजी महिला सदस्य रामकु बुवा यांचे सहकार्य राहिले. गावातील प्रत्येक नागरिकांनी या समितीच्या कार्यात सहभागी होऊन ग्राम विकासाला नवीन दिशा देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# दर्यापूर तालुक्यात आजपासून शंकरपटाची धूम

## तामसवाडी व लखापुर फाटा येथे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.17 )–** दर्यापूर तालुका व परिसरातील बैलगाडा शर्यतीच्या शौकिनांना मंगळवारपासून पुढील तीन दिवस शंकरपटाचा थरार अनुभवायला मिळणार आहे. 18 ते 21 फेब्रुवारी दरम्यान तालुक्यातील तामसवाडी फाटा आणि लखापुर फाटा या दोन ठिकाणी शंकरपटाची आयोजन करण्यात आले आहे.

तामसवाडी फाटा येथे गोपाल पाटील अरबट मित्र परिवाराच्या वतीने 18 ते 21 फेब्रुवारी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज शंकर पटाचे आयोजन करण्यात आले आहे. खुला गट, क गट व गावगाडा गट अशा विभागात हा शंकरपट होणार आहे. खुल्या गटासाठी 61 हजार रुपयांचा पुरस्कार ठेवण्यात आला आहे. क गटातील विजेत्याला 41 हजारांचा तर गावगाडा गटातील विजेत्याला 12 हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. या शंकरपटात एकूण 6 लाख रुपयांच्या पुरस्कारांची लयलुट होणार आहे. या पटाचे समालोचक म्हणून घड्याळ सम्राट राजू मंदाडे हे काम पाहणार आहे.

त्यानंतर 20 व 21 फेब्रुवारी रोजी अमरावती मार्गालगत लखापुर फाटा येथे जंगी शंकर पट होणार आहे. खुला गट, क गट व गावगाडा गट अशा तीन विभागात हा शंकर पट घेतला जाणार असून खुल्या गटासाठी 51 हजार रुपयांचा प्रथम पुरस्कार ठेवण्यात आला आहे. क गटात विजेत्याला 31 हजार रुपयांचे तर गावगाडा गटात 7 हजार रुपयांचे पहिले पारितोषिक देण्यात येईल. या शंकरपटाचे समालोचन घड्याळ



सम्राट उल्हास दाभाडे करणार आहेत. दोन्ही शंकर पटांमध्ये बैलगाडा मालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत सेवालाल महाराजांना अभिवादन

**अमरावती –** संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अधिक्षक निलेश खटके यांनी अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही पुष्पार्पण करुन संत सेवालाल महाराज यांना अभिवादन केले.

# परराज्यातून आलेल्या शेळ्या मेंढ्यांचे लसीकरण

## दर्यापूर पशु विभागाचा पुढाकार



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.17 ) –** अनेक परप्रांतीय पशुपालक आपल्या शेळ्या मेंढ्या व इतर जनावरे घेऊन दरवर्षी महाराष्ट्रात तसेच अमरावती जिल्ह्यातही दाखल होत असतात. या जनावरांना विविध आजारांची लागण होऊ नये, यासाठी दर्यापूर पशु विभागाच्या वतीने त्यांच्यावर रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले. दर्यापूर तालुका व परिसरातील विविध गावांमध्ये बाहेरच्या राज्यातून अनेक पशुपालक आपल्या जनावरांना चराईसाठी घेऊन येत असतात. या जनावरांना आजाराची लागण होऊन त्याचा प्रादुर्भाव होऊ नये, याकरिता पशु विभाग दक्षता घेत असतो. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु विभागाच्या वतीने या पशुंचे लसीकरण करण्यात आले. पशु विभागातील डॉ. प्रतिक बोडके, सहाय्यक आयुक्त डॉ. पल्लवी फुसे, पशुविकास अधिकारी डॉ. दिलीप खंडारे डॉ. अनिल गवई यांनी ही लसीकरण मोहीम पार पाडली.

# चांदूरबाजार येथे शिक्षक महासंघाची सहविचार सभा

## संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांची उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.17 )–** चांदूरबाजार येथे शिक्षक महासंघाची सहविचार सभा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या सभेमध्ये शिक्षकांच्या समस्या, भविष्यात शाळा वाचविण्यासाठी करावे लागणार असलेले प्रयत्न व शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. चंद्रशेखर भोयर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

पुढील काळात एकत्रितपणे ताकदीने काम करण्याची गरज आहे, आगामी शिक्षक मतदार संघाची निवडणूक एक ते दीड वर्षांनी होणार आहे. मागील निवडणुकीत आपल्याकडून जी चूक झाली आणि त्यामुळे अकार्यक्षम लोकप्रतिनिधी निवडून दिला गेला, त्या बाबी आपल्याला टाळायच्या आहेत, असे शेखर भोयर यावेळी बोलताना म्हणाले. आज शिक्षकांची एकही समस्या शासन दरबारी विधानमंडळात मांडली जात नाही. शिक्षकाला कोणी वाली नाही. त्यामुळेच शिक्षकांसाठी घातक ठरणारे निर्णय शासनाकडून घेतले जात आहेत. येणाऱ्या काळात मराठी शाळा शिल्लक राहतील की नाही हे सांगता येत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. शिक्षकांना सरसकट निवड श्रेणी नाही, कॅशलेस मेडिकल योजना नाही, दहावीची पदोन्नती नाही, यासोबतच अनेक प्रश्न सोडविण्यासाठी विधानमंडळात शिक्षकांचा खंबीर जनप्रतिनिधी असणे ही काळाची गरज आहे, असे भोयर यावेळी बोलताना म्हणाले. सभेला गावंडे सर, राहुल मोहोड, नांदुरकर सर, गुजरकर सर, इकबाल सर, तालुका अध्यक्ष मनोज तायवाडे, सचिव संतोष भोरे, प्रणित देशमुख, हेमंत सिनकर, मनोज



पोकळे, सचिन बोराळकर, अमोल ठाकरे, गजानन ठाकरे, शिक्षक देवतळे, गावंडे, खापरे, पारधी, अहिर, इंगोले, बर्वे, मसूद काजी, धुर्वे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# चांदूर बाजार, शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात दलालाचा सुळसुळाट?

## बिन पगारी फुल्ल अधिकाऱ्यांची मौजा ही मौजा




**बादल डकरे**
**चांदूर बाजार,( दि.17 )–** चांदूरबाजार तालुक्यातील शिरसगाव कसबा आणि चांदूरबाजार पोलीस स्टेशन मध्ये दलालांचा वावर वाढल्याचे पहायला मिळत आहे. बिन पगारी फुल्ल अधिकारी असलेल्या या दलालांची मौजा ही मौजा असून, पोलीस विभागात अश्या दलालांची गरज काय? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

आजपर्यंत अन्य विभागात दलालांचा सुळसुळाट असल्याचे



पहायला मिळत होते, मात्र पोलीस विभाग या प्रकारापासून दूर होता. मात्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाया वाढल्याने खासगी व्यक्तींना हाताशी ठेवण्याचा प्रकारही वाढल्याचे पहायला मिळत आहे. अवैध व्यावसायिकांकडून हप्ते वसुली, एखाद्या प्रकरणात मध्यस्ती करणे अश्या विविध प्रकाराकरिता हा बाहेरचा माणूस तैनात तर केला नाही ना, असा संशय व्यक्त केला जात आहे. चांदूरबाजार पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस खुपिया विभागाकडून या सर्व बाबींकडे लक्ष ठेवले पाहिजे, असे असताना खुपिया विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करित आहे. उलट खुपिया विभाग सोबतच या खाजगी इसमाचा जास्त घरोबा दिसत आहे. अशीच परिस्थिती शिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत पहायला मिळत आहे.

## एसडीपीओ घेतील का दखल ?

अचलपूर झोन चे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.शुभम कुमार या प्रकाराची दखल घेवून काय कारवाई करतील? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल, गेल्या काही दिवसांपासून पोलीस स्टेशन हद्दीतील सुनील नामक कर्मचारी हा मी ठाणेदार याची बदली करू शकतो, मात्र ठाणेदार माझी बदली करू शकत नाही अश्या बतावणी खाजगीत करत आहे. या सुनीचे चर्चा चर्वण गावभर सुरु आहे. काही गावपुढारी त्याला आपल्या हाताशी घेऊन मोठ्या प्रमाणावर अवैध व्यावसायिकांना सूट देत आहे. काही अवैध व्यावसायिकांशी त्याची भागीदारी देखील असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आता चांदूरबाजार व शिरजगाव कसब पोलीस स्टेशन कडे वरिष्ठ यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची चुप्पी अनेक संशयांना देताय थारा ?

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अचलपूर विभागात येत असून मात्र खुल्या आम अवैध दारू विक्री, गुटखा तस्करी, वरली मटका, गौवंश तस्करी, वाळू तस्करी, गावठी दारू अड्डे, विदेशी दारूची बेकायदेशीर विक्री होत असताना स्थानिक गुन्हे शाखेला या सर्व अवैध व्यावसायिकांची माहिती असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकात शिरजगाव पोलीस स्टेशन मधील कर्मचाऱ्यांचे नातेवाईक असल्याने त्या नातेवाईकांचा आधार घेत अवैध व्यावसायिक करणाऱ्यांसोबत चांगल्या आर्थिक हितसंबंध जोपासले जात असल्याची माहिती आहे. मात्र याची खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुखांना नसणे हा देखील एक गंभीर प्रकार आहे.

## तेल मालिशचा बहाणा

तेल मालिशच्या करण्याच्या नावावर सदर खाजगी इसम पोलीस स्टेशनमध्ये वावरत असल्याची माहिती आहे. या दलालाचे नातेवाईक वाळू तस्करीत मोठ्या प्रमाणात सक्रिय असल्याने त्याच्याकडून पोलिसांच्या प्रत्येक हालचालीची इंतभूत माहिती त्याच्याकडून बाहेर पुरविल्या जाते. त्यामूळे पोलीस कर्मचारीच या इसमामूळे 'घर के भेदी' ठरत आहेत.

# स्काऊट गाईड मेळाव्यात मुंधडा हायस्कूलला विजेतेपद




## नऊ पुरस्कारांसह प्राप्त केले नेत्रदीपक यश

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.17 ) –** भातकुलीच्या मातोश्री गौराबाई गुढे आश्रमशाळा येथे 41 वा अमरावती जिल्हा स्काऊट–गाईड मेळावा नुकताच पार पडला. या तीन दिवसीय निवासी मेळाव्यात जिल्ह्यातील 53 शाळांचे स्काऊट–गाईड पथक सहभागी झाले होते. मेळाव्यात उद्खेडच्या श्री रामविलास मुंधडा हायस्कूल ने सर्वाधिक नऊ पुरस्कार प्राप्त करून दैदिप्तमान यश प्राप्त केले व आपले वर्चस्व सिद्ध केले.

मेळाव्यात विविध 14 प्रकारात स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. रामबिलास मुंदडा हायस्कूलच्या स्काऊट पथकाने तंबू सजावट, लोकनृत्य व हस्तकला या स्पर्धांमध्ये प्रथम, बिन भांड्याचा स्वयंपाक, बँड संचलन, शोभायात्रा यामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर गाईड पथकाने बँड संचालनामध्ये प्रथम, तर तंबू सजावट व हस्तकलामध्ये दुसरा क्रमांक असे एकूण नऊ स्पर्धांमध्ये पारितोषिक मिळविले व जिल्हास्तरीय विजेतेपदाचा बहुमान प्राप्त केला.

याशिवाय मागील महिन्यात तामिळनाडूत राष्ट्रीय पातळीवरील डायमंड जुबली मेळाव्यात दिनेश शर्मा यांच्या नेतृत्वात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुंधडा हायस्कूलला गौरव चिन्ह देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले. कलाशिक्षक रवींद्र खैरकर, स्काउटर यशवंत सलामे यांच्या आथक परिश्रमाने व गाईडर मीनाक्षी बदुकले यांच्या सहकार्याने शाळेला हे यश प्राप्त करता आले, असे शर्मा यांनी सांगितले. जिल्हा मेळाव्यात सहभागी झालेल्या स्काऊट पथकात सार्थक जवंजाळ, दीपेश कुरवाडे, निर्भय कटकतलवारे, निर्भय राऊत, नमन ठाकरे, वैष्णव काकडे, मानव भगत, पार्थ भटकर, हर्षल चिकटे, आकाश देशमुख, श्रवण गोहत्रे, उज्वल सुसतकर, रेहान शहा, प्रथमेश शहाणे, गौरव धुर्वे, आदित्य बक्सरे यांचा तर गाईड पथकात पल्लवी कुरवाडे, वैष्णवी तेटू, अश्विनी डरंगे, जान्हवी तट्टे, पायल नेवारे, सोनाली कुरवाडे, देवयानी आघाडे, ईश्वरी आढाव, ईश्वरी आठवले, गौरी ठाकरे, साक्षी सावरकर, वेदिका ठाकरे, जान्हवी गतफणे, ईश्वरी गोहाड, सोनम खंडारे, नर्मदा धुर्वे, वानखडे, माधुरी अवजारे, प्रज्ञा वानखडे यांचा समावेश होता. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मुंधडा, सचिव देवेंद्र मुंधडा, मुख्याध्यापक नरेंद्र बाकडे यांनी सर्वांचे कौतुक केले आहे.